यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475
मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

दिनांक : १४ /११ /२०२५

# उद्बोधन वर्ग अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६, एम. ए पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम (मराठी M49)

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (DEB) मार्गदर्शक सूचनेनुसार पदव्युत्तर पदवी एम. ए. मराठी (M49) (प्रथम व तृतीय सत्र) या शिक्षणक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी दि.०६/११/२०२५ रोजी उद्बोधन वर्गाचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. एम.ए. मराठी या शिक्षणक्रमाच्या प्रथम सत्र च्या विद्यार्थ्यांसाठीनी सकाळी ११.०० ते दु. ०१.०० या कालावधीत तर दुपारी २.३० ते ४.०० या वेळेत एम.ए. तृतीय सत्राच्या प्रवेशित विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन सत्रांचा लाभ घेतला. मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेमध्ये माध्यमातून आयोजित केला होता. यावेळी डॉ. बाळासाहेब दिघे, शैक्षणिक संयोजक मराठी, यांनी प्रास्ताविक व उद्बोधन वर्ग आयोजित करण्याची भूमिका विशद केली. उद्बोधन वर्गासाठी मार्गदर्शक म्हणून विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना दूरस्थ शिक्षणप्रणाली, विद्यापीठाची पार्श्वभूमी, विद्यापीठचा परिचय, उदिष्टे, विद्यापीठ कार्यपद्धती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या उद्बोधन सत्रात डॉ. बाळासाहेब दिघे, यांनी PPT च्या माध्यमातून एम. ए. मराठी (M49), प्रथम सत्र च्या उपस्थित विद्यार्थ्यांना या शिक्षणक्रमाची ओळख करून दिली. मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचा परिचय, उद्दिष्टे, शिक्षणक्रमाची उद्दिष्टे, निष्पती, शिक्षणक्रम संरचना, अभ्यासक्रम संरचना, श्रेयांक पद्धती, मूल्यमापन संरचना, मुल्यांकन पद्धत, स्वयं-अध्ययन साहित्य, समंत्रण सत्रे, गृहपाठ पद्धती, विद्यार्थी कल्याणाच्या विविध योजना या विषयी सविस्तर सादरीकरण केले.

शेवटी प्रश्नोउत्तराचे सत्र आयोजित करून विद्यार्थ्यांनी शिक्षणक्रमाविषयी तसेच अभ्यासक्रमाबाबत विविध प्रश्न विचारले. त्या सर्व प्रश्नांचे विस्तृत निरासरण करण्यात आले. एम. ए. मराठी शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर यातून भविष्यकालीन करिअरविषयक मार्गदर्शन मिळण्यासाठी अतिरिक्त सत्र/ वर्ग घेण्याची मागणी केल्यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना आश्वस्त करण्यात आले.


दुपारच्या दुसऱ्या सत्रात एम.ए. मराठी (M49) या तृतीय सत्रातील प्रवेशित विद्यार्थ्यांना मा.संचालक प्रा. नार्गाजून वाडेकर यांनी दूरस्थ शिक्षणप्रणाली, परिक्षा पद्धती याविषयी मार्गदर्शन केले. तर मराठी शिक्षणक्रम संयोजक डॉ. बाळासाहेब दिघे यांनी PPT द्वारे संशोधन प्रकल्प, संशोधन प्रकल्प विषय सूची याबद्दल अधिक माहिती दिली. यावेळी संशोधन प्रकल्प कार्य करताना विद्यार्थ्यांनी येणाऱ्या समस्या प्रश्नरूपाने मांडल्या. विद्यार्थ्यांच्या समस्येचे निराकरण करण्यात आले.


या उद्बोधन सत्रात प्रवेशित विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांचे आभार मानून मा. संचालक यांच्या संमतीने उद्बोधन वर्गाचा समारोप करण्यात आला. हा उद्बोधन वर्ग यशस्वी होण्यासाठी तांत्रिक सहाय्य डॉ. विशाल आबेडकर, डॉ.महेंद्र भगत, डॉ. पन्नालाल धुर्वे, डॉ. सुनील भारोडकर, शैक्षणिक संयोजक, व श्री. गुलाब घाटाळ, प्रशासकीय सहाय्यक यांनी मोलाचे सहकार्य केले.

**सोबत** : ऑनलाईन झूम लिंक,युट्युबलिंक व फोटो -

https://us06web.zoom.us/j/87006779491?pwd=kXeb03sYmWUs3yvnX4m6Gb8HwsbAKt.1

Yutube Link : https://www.youtube.com/live/n0U-Ia2TwNE?si=KA55xNXsoi1fJv0q






मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
ज्ञानगंगा घरोघरी
य.च.म.मु.वि., नाशिक

संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा